पिंपरी चिंचवड महानगरपालिका
**इ क्षेत्रीय कार्यालय**
कार्यपत्रिका क्रमांक-१
**(सभापती निवडीची सभा)**
सभावृत्तांत

दि.- ०६/०२/२०१४ वेळ- दुपारी ३:३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीच्या सभापती निवडीची विशेष सभा गुरुवार दिनांक ०६/०२/२०१४ रोजी दुपारी ३.३० वाजता यशवंतराव चव्हाण सभागृह, (मा.महापालिका सभाग्रह ) पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी १८ येथे **मा.श्री.गणेश पाटील, पिठासीन अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,पुणे** यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती . सभेस खालील सन्मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१ मा.आल्हाट मंदा उत्तम
२ मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
३ मा.मोहिनीताई विलास लांडे
४ मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५ मा.श्रध्दा बाजीराव लांडे
६ मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
७ मा.विश्वनाथ विठोबा लांडे

याशिवाय मा.श्रीमती आशादेवी दुरगुडे- क्षेत्रीय अधिकारी, श्री. श्रीनिवास दांगट-प्रशासन अधिकारी इ क्षेत्रीय कार्यालय हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------

प्रथम क्षेत्रीय अधिकारी मा.श्रीमती आशादेवी दुरगुडे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन दिनांक ०५/०२/२०१४ रोजी विहीत मुदतीत प्राप्त झालेले एक नामनिर्देशन पत्र वाचून दाखविले व पिठासिन अधिकारी यांचेकडे सुपूर्द करुन पुढील कार्यवाही सुरु करणेबाबत विनंती केली. सदर एक नामनिर्देशन पत्रामधील उमेदवारांचे सुचक व अनुमोदक खालील प्रमाणे होते.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचक | अनुमोदक |
|---|---|---|---|
| १) | गव्हाणे सुरेखा शंकर | आल्हाट मंदा उत्तम | श्रध्दा बाजीराव लांडे |

वरीलप्रमाणे इ प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली व ते वैध ठरवण्यात आले. त्यामध्ये मा. इ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. गव्हाणे सुरेखा शंकर या एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. त्यानंतर उमेदवारी अर्ज मागे घेण्याकरिता दुपारी ३.३५ ते ३.५० असा १५ मिनीटांचा अवधी देणेत आला. सदर कालावधीमध्ये उमेदवारांनी उमेदवारी माघारीचा अर्ज दिला नाही.

ठराव क्रमांक-१
दिनांक- ६/२/२०१४
सूचक- आल्हाट मंदा उत्तम

विषय क्रमांक- १
विभाग- इ प्रभाग प्रशासन
अनुमोदक- श्रध्दा बाजीराव लांडे

इ प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. गव्हाणे सुरेखा शंकर या एकच रितसर वैधरित्या नामनिर्देशित उमेदवार असल्याने मा. गव्हाणे सुरेखा शंकर यांची इ प्रभाग समितीचे सभापती पदावर बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करणेत येत आहे.

( गणेश पाटील)
पिठासीन अधिकारी
तथा
अप्पर जिल्हाधिकारी
पुणे.

त्यानंतर नवनिर्वाचित **सभापती मा. गव्हाणे सुरेखा शंकर** यांचे अध्यक्षतेखाली विषयपत्रिकेवरील इतर विषय खालीलप्रमाणे मंजूर करणेत आले.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक- २ | विषय क्रमांक- २ |
| दिनांक- ६/२/२०१४ | विभाग- इ प्रभाग प्रशासन |
| सुचक- मा. मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे | अनुमोदक-मा. मा.विश्वनाथ विठोबा लांडे |

इ प्रभाग समितीच्या मासीक सभेचा दिनांक व वेळ निश्चित करणे.

इ प्रभाग समितीची मासिक सभा ही प्रत्येक महिन्याचे **पहिल्या गुरुवारी दु. ३.०० वा.** ( पहिल्या गुरुवारी सार्वजनिक सुट्टी / सुट्ट्या असेलतर दुस-या दिवशी) क क्षेत्रीय कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन नवनिर्वाचित **सभापती मा. गव्हाणे सुरेखा शंकर** यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

**सही/-**
( गव्हाणे सुरेखा शंकर )
सभापती
इ प्रभाग समिती, भोसरी-३९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/६९४/२०१४
दिनांक- ६/२/२०१४

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
**( इ क्षेत्रीय कार्यालय)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका